दिनांक :

प्रती,

..............................

..............................

**विषय : केवळ हिंदु सणांच्या वेळी प्रदूषणविरोधी कायद्याचा गैरवापर करणाऱ्या ‘महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळा’च्या संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबित करून कारवाई करण्याविषयी...**

**महोदय,**

भारतीय संविधान आपल्याला समानतेची शिकवण देते. ती सर्वच बाबतीत असायला हवी; मात्र हवा, पाणी, जल वा अन्य मार्गाने होणारे प्रदूषण रोखण्यासाठी ‘महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळा’द्वारे प्रदूषणविरोधी कायद्याचा वापर पक्षपातीपणे हिंदूंच्या विरोधातच केला जात आहे, असे काही उदाहरणांवरून लक्षात आले आहे.

*** या संदर्भात आम्ही आपल्याला पुढील सूत्रे लक्षात आणून देत आहोत...**

1. ‘पर्यावरण (संरक्षण) कायदा 1986’ नुसार पर्यावरणाचे नुकसान करणे गुन्हा आहे. ते केल्यास पाच वर्षांपर्यंतची शिक्षा आणि आर्थिक दंड आहे; मात्र या कायद्यानुसार कारवाई करण्याचा अधिकार केवळ ‘महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळा’च्या प्रमाणित अधिकाऱ्यांनाच आहे. म्हणजेच सामान्य माणूस भोंग्यांमुळे होणारा त्रास थांबवण्यासाठी पोलीस ठाण्यात तक्रार करू शकत असला, तरी पोलीस ‘पर्यावरण (संरक्षण) कायदा 1986’ नुसार गुन्हा नोंद करूच शकत नाहीत. तसेच ‘ध्वनीप्रदूषण नियम, 2000’ हे वरवर केलेले नियम आहेत. ज्यामध्ये शिक्षेची तरतूद नाही, असे दिसते. याशिवाय भोंगा लावायचा असेल, तर परवानगी पोलीस देणार; परंतु त्यांना कठोर कारवाईचे अधिकारच नाहीत, ते अधिकार प्रदूषण मंडळांच्या अधिकाऱ्यांकडे आहेत.

2. वर्ष 2015 ते 2021 या 7 वर्षांच्या कालावधीत ‘महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळा’ने हिंदूंच्या दहीहंडी, गणेशोत्सव आणि नवरात्रोत्सव मंडळांवर ध्वनीप्रदूषण केले म्हणून 230 खटले दाखल केले आहेत, तर मुसलमानांवर केवळ 22 खटले दाखल आहेत, असे माहिती अधिकारातून उघड झाले आहे. यातील एकूण 252 खटल्यांपैकी 230 खटले हे गणेशोत्सव, नवरात्रोत्सव, दहीहंडी उत्सव साजरे करणारी मंडळे, संघटना अथवा कार्यकर्ते यांच्यावरच झालेले दिसतात. 22 खटले हे मुसलमानांच्या संदर्भातील असले, तरी त्यातील सर्वच गुन्हे मशिदींबाबत आहेत, असे नाही. एकूणच 92 टक्के गुन्हे हे हिंदूंवर आणि 8 टक्के गुन्हे हे मुसलमानांवर दाखल झालेले आहे. हा कारवाईमध्ये सरळसरळ पक्षपात केला जात आहे.

3. हिंदूंचे सण तर वर्षांतून एकदा येतात. या उलट वर्षाचे 365 दिवस प्रतिदिन पाचवेळा मशिदींवरील अनेक भोंग्यांमुळे मोठ्या प्रमाणात ध्वनीप्रदूषण होत आहे, तर मग त्याविषयी गुन्हे इतके कमी का आहेत ? या ध्वनीप्रदूषणाच्या विरोधात महाराष्ट्रातील नागरिकांनी अनेकदा कारवाईची मागणी केली आहे. गृहमंत्रालयाच्या आकडेवारीनुसार केवळ मुंबईतच 1144 मशिदी आहेत. संपूर्ण महाराष्ट्रतील 36 जिल्ह्यांतील एकत्रित मशिदींची आकडेवारी हजारोंच्या संख्येत आहे. मग अजानामुळे प्रतिदिन कितीतरी पटीने ध्वनीप्रदूषण होत आहे, तरीही प्रदूषण मंडळ त्यावर काही कारवाई करत नाही. अशा पक्षपाती कारवाईमुळे हिंदूंमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे, हे प्रदूषण मंडळाने आणि प्रशासनाने लक्षात घ्यायला हवे.

4. एकंदरीत हिंदूंच्या बाबतीत कायदा कठोरपणे वापरला जातो आणि दुसरीकडे मुसलमानांना सूट दिली जाते. हिंदूंना दुय्यम नागरिक म्हणून वागवले जात आहे का ? असा प्रश्न निर्माण होतो. हा एकप्रकारे कायद्याचा गैरवापरच आहे. कायद्याचा गैरवापर करणे, हाही एक गुन्हा आहे.

5. धार्मिक स्थळांवरून होणाऱ्या ध्वनीप्रदूषणाविषयी प्रशासन कारवाई करत नाही, म्हणून अनेक याचिका न्यायालयात दाखल झाल्या होत्या. त्यात सर्वोच्च न्यायालय आणि देशातील अनेक उच्च न्यायालयांनी धार्मिक स्थळांवरून होणाऱ्या ध्वनीप्रदूषणाविषयी कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत. असे असतांना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने त्यांच्यावर कारवाई का केली नाही ?

6. गणेशोत्सव, दिवाळी आदी सण आले की, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ राज्यातील 27 जिल्ह्यांत 290 ठिकाणी 'ध्वनीमापन यंत्र' घेऊन 'ध्वनीप्रदूषण किती झाले' ते मोजते. तसेच 'वायू आणि जल प्रदूषण किती झाले', तेही मोजते. राज्यभरात दिवाळीच्या कालावधीत ध्वनी आणि वायू याचे दर तासाला निरीक्षण नोंदवले जाते. दरवर्षी याचा अभ्यासपूर्ण अहवाल तयार करून मंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येतो. वर्ष 2015 पासून असे अहवाल संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. प्रशासन 'सेक्युलर' आहे, तर वर्षभर प्रतिदिन मशिदींवरील भोंग्यांद्वारे होणाऱ्या ध्वनीप्रदूषणाचे सर्वेक्षण मंडळ का करत नाही ? बकरी ईदला प्राणी-हत्येमुळे होणाऱ्या जलप्रदूषणाचे निरिक्षण का नोंदवत नाही ? मोहरमच्या वेळी ताबूतांचे पाण्यात विसर्जन केल्यामुळे होणाऱ्या जलप्रदूषणाचे निरिक्षण का नोंदवत नाही ? त्याचे अहवाल का तयार केले जात नाहीत ? भारतीय राज्यघटनेनुसार नियम-कायदे सर्वांना सारखे असतांना हा पक्षपात इतके वर्षे का केला जात आहे ? मुसलमान विशेष नागरिक असल्याने त्यांना कायद्यात सूट दिली आहे का ?

**※ हिंदूंच्या बाबतीत होणारा पक्षपात दूर होण्यासाठी आमच्या मागण्या पुढीलप्रमाणे आहेत...**

1. केवळ हिंदूंना लक्ष्य करण्यासाठी प्रदूषणविरोधी कायद्याचा गैरवापर करणाऱ्या, न्यायालयाच्या आदेशाचे पालन न करणाऱ्या, कर्तव्यात कसूर करणाऱ्या, हिंदूंशी पक्षपाती पद्धतीने वागणाऱ्या प्रदूषण मंडळाच्या सर्व संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबित करण्यात यावे. त्यांची खातेनिहाय चौकशी करून कारवाई करण्यात यावी.

2. मुसलमानांमध्ये बहावी, सुन्नी, शिया, हनीफी, देवबंदी, बरेलवी, मालिकी, शाफई, हंबली, बाहेरा, अहमदीया, इन्शा अशरी, जैदीया, दाऊदी बोहरा, खोजा, नुसैरी अशा असंख्या जाती आहेत. हे लोक जातीविषयी इतके कट्टर असतात की, एकमेकांच्या मशिदीतही जात नाहीत, त्यांच्या मशिदी आणि अजान यांच्या वेळा वेळवेगळ्या असतात. म्हणजे केवळ पाच वेळा मशिदींवरील भोंगा वाजतो, असे नाही, तर त्यापेक्षा अधिक वेळा दिवसांतून भोंगे वाजतात. असे वर्षातील 365 दिवस मशिदींवरून भोंग्याद्वारे प्रचंड ध्वनीप्रदूषण केले जाते. याचा नागरिकांना प्रचंड त्रास होतो. त्याचे राज्यभरातील सर्वेक्षण दिवाळीप्रमाणे प्रत्येक घंट्याला करून त्याचे अहवाल तयार करण्यात यावेत. तसेच बकरी ईद, मोहरम आणि अन्य धर्मिय वा पंथीयांच्या सण-उत्सवांच्या वेळी होणाऱ्या प्रदूषणाविषयी अभ्यासपूर्ण अहवाल तयार करावेत आणि ते प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करावेत.

3. या अहवालानुसार घडलेल्या गुन्ह्यांवर कायद्यानुसार योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात यावी.

**आमच्या मागण्या मान्य न झाल्यास राज्यातील सार्वजनिक उत्सव मंडळे, हिंदु संघटना मिळून रस्त्यावर उतरून राज्यव्यापी आंदोलन छेडतील, याची नोंद घ्यावी.**

कळावे, ही विनंती !

आपला नम्र,